दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.२ जून २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय, सीबीएसई बोर्डाच्या बारावीच्या परीक्षा रद्द

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

बारावी सीबीएसई परीक्षा रद्द करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सीबीएसईच्या बारावीच्या बोर्ड परीक्षांच्या संदर्भात आढावा बैठकी घेण्यात आली. यावेळी सीबीएसई बोर्ड तसेच राज्य सरकारसह सर्वांची मते घेण्यात आली. त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. बारावीच्या सीबीएसई परीक्षांचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेण्यात आला आहे असे पंतप्रधानांनी यावेळी म्हटले. करोनाचा शैक्षणिक कॅलेंडरवर परिणाम झाला. बोर्ड परीक्षेच्या मुद्द्यामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये प्रचंड चिंता निर्माण झाली होती. देशातील काही राज्ये प्रभावी मायक्रो–कंटेन्टमेंटद्वारे परिस्थिती हाताळत आ–हेत, तर काही राज्यांनी अजूनही लॉकडाउनचा पर्याय निवडला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थी, पालक आणि शिक्षक स्वाभाविकच चिंतेत पडतात. त्यामुळे अशा प्रकारच्या तणावग्रस्त परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षेस भाग घेण्यास भाग पाडता कामा नये असे पंतप्रधान यावेळी म्हणाले.



**माणुसकी म्हणजे प्रेम, माणुसकी म्हणजे जाणीव, माणुसकी म्हणजे माणसाने माणसाची केलेली कदर, समोरच्या व्यक्तीचा केलेला आदर, माणूसकी म्हणजे निस्वार्थपणे माणसातील माणुस ओळखून पुढे केलेला मदतीचा हात आणि हेच माणुसकीचे नाते जपत कुठल्याही प्रसंगात लोकांना मदत करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर अविरतपणे करीत आले आहेत, त्यामुळे खऱ्या अर्थाने ते देवदूताची भूमिका पार पाडत आहेत.**

# देवदूत लोकनेते रामशेठ ठाकूर



एक गोष्ट खरी आहे की, हाडामासाच्या माणसावर, त्यांच्या कर्तृत्वावर त्यांची अधिक श्रध्दा आहे. माणसाच्या अंगात असलेल्या सामर्थ्याचा, कर्तत्व शक्तीचा, चांगुलपणाचा प्रत्यय ते चांगले जाणतात. माणसाने ठरविले तर आकाशाला भिडणार मोठेपण त्याच्या अंगी येवू शकेल असा त्यांचा आत्मविश्वास आहे, फक्त माणसाच्या ठायी असायला हवा तो दढ निश्चय. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनात कर्तत्व फुलविणारी माणसे भेटत गेली आणि त्या प्रत्येक व्यक्तीने त्यांना चांगले विचार दिले, दिले म्हणण्यापेक्षा ते त्यांनी घेतले. या सर्व व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात आदरभाव आहे. आता पर्यंतच्या आयुष्यात त्यांना जो लौकिक मिळाला त्याच श्रेय दयायच असेल तर ते कुणा एका व्यक्तीला न देता परिस्थितीला दयावे लागेल, परिस्थितीनेच त्यांना घडविले. विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीमुळे काही माणसे, काही व्यक्ती त्यांच्या सानिध्यात आल्या परिस्थिती शहाणं बनविते या वास्तव्याची जाण करून दिली. मार्गदर्शन केले, आयुष्य सदैव समध्द केले, अनुभवाची क्षितीजे विस्तत झाली म्हणूनच आयुष्यात जे काही चांगल घडलं त्याच श्रेय परिस्थितीला दिले पाहिजे. मातोश्री भागूबाई, पिताश्री चांगू ठाकूर व सासरे जनार्दन भगत साहेबांचे आशिर्वाद त्यांना लाभले, प्रत्येक पुरुषाच्या यशात स्त्रीशक्ती असते ती शक्ती त्यांच्या पत्नी शकुंतला यांनी दिली तर पुढील कार्याला साथ लाभली ती आमदार प्रशांत ठाकूर व परेश ठाकूर या सुपुत्रांची. शाहू, फुले, आंबेडकर, कर्मवीर अण्णांचा आदर्श घेऊन ते नेहमी कार्यरत राहिले असून त्यांचा माणसांवर अधिक विश्वास आहे. माणूसकी व कर्तव्याची जाण ठेवून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या जवळ असलेली आर्थिक शक्ती लोककल्याणासाठी सार्थकी लावण्याचे ठरविले आणि त्यांनी तसे केल आणि आताही करीत आहेत. गरीब गरजूंना मदत, सामाजिक, सांस्कतिक, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रांना भरघोस मदतीचा हात, रूग्ण, खेळाडू, शिक्षण क्षेत्रात उच्च शिक्षणासाठी सहकार्य, आ–पत्ती, दुष्काळ, अनेक घटकांना मदत हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा दानशुरपणा अजूनही सुरूच आहे आणि तो सार्थकी लागत आहे म्हणूनच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मनाला समाधान वाटत असून राजकीय व आर्थिक शक्ती लोक कल्याणासाठी सार्थकी लावणारे लोकनेते म्हणून ते सुपरिचित आहेत.

लोकनियुक्त प्रतिनिधी खासदार म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या या पदाच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात केलेली दर्जेदार विकासकामे आजही लोकांच्या स्मरणात राहिली आहेत. खासदार म्हणून त्यांनी येथील समस्या, प्रश्न संसदेत मांडतानाच रायगडच्या विकासाचा आलेख उंचावला. त्यामुळे आजही गावांतील ज्येष्ठ नागरिकांकडून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांचा उल्लेख आवर्जून ऐकायला मिळतो. देशभरातील विद्यालये पनवेल, नवी मुंबईत शिरकाव करीत असताना येथील गोर गरीब विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट शिक्षणाची दालने उभी करून दिली. आज ज्या संस्थेच्या माध्यमातून गेली २७ वर्षे शिक्षणाचे पवित्र काम केले जात आहे, त्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक शिक्षण संस्थने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्याचे सर्व श्रेय लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाचे आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची स्थापना करून खऱ्या अर्थाने लाखो लोकांना वैद्यकीय, आर्थिक मदत, शैक्षणिक साहित्य व शिक्षणासाठी आर्थिक मदत, जीवनावश्यक वस्तूचे वाटप, अशी विविध प्रकारची मदत देत आधार दिला आहे. या मंडळाच्या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबातील होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी उलवा नोडमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची स्थापना केली. आणि ते एवढ्यावर थांबले नाहीत तर त्यांनी प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी निःशुल्क स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची दारे खुली केली.

सांस्कृतिक ठेवा म्हणून आगरी कोळी आणि आता मल्हार महोत्सव नावाने सुपरिचित झालेल्या महोत्सवाने संपूर्ण रायगड, नवी मुंबईसह राज्यात वाहवा मिळवली. अत्यंत सुंदर नियोजन आयोजनामुळे या महोत्सवाची दरवर्षी उत्सुकता वाढत राहिली. त्याचबरोबर पनवेल मॅरेथॉन त्यानंतर खारघर नावाने सुरु झालेल्या या स्पर्धेच्या दर्जेदार आयोजनामुळे संपूर्ण परिसरात मॅरेथॉन व त्या अनुषंगाने व्यायामाचे महत्व वाढले. आणि पनवेल मध्ये सुरु झालेल्या या मॅरेथॉनने संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावले. दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा.

ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा सुरु केली. गेली २० वर्षे हि परंपरा अखंडपणे सुरु असून राज्यातील सर्वात मोठी हि दिवाळी अंक स्पर्धा म्हणून सुप्रसिद्ध आहे.ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यामुळे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांना समाजकारणाबरोबर शिक्षणाची आवड आहे, त्याचप्रमाणे ते क्रीडा क्षेत्राचीही आवड ठेवतात.

त्यामुळे देशातील कबड्डी पट्टूचा थरार रायगड, नवी मुंबईला अनुभवायला मिळावा यासाठी राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन त्यांनी सातत्याने करत खेळ आणि पर्यायाने खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम ते करीत आले आहेत.

शिक्षण हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आत्मा त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांने उच्च शिक्षण घेतले पाहिजे हि त्यांची तळमळ असते. उच्च शैक्षणिक क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत **(पृष्ठ ४/...)**

**शब्दांकन**
**हरेश महादेव साठे**
**प्रसिद्धी प्रमुख (९७६९४०९१७८)**



# पनवेलमध्ये आजपासून दुकाने सकाळी ७ ते दुपारी २ यावेळेत सुरु राहणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ताळेबंदीमुळे रुग्णांचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येत आहे. मात्र असे असले तरीही लॉकडाऊनमुळे अनेकांचे रोजगार बुडत आहेत. हाताला काम नसल्याने अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. विविध उपाययोजना आणि निर्बंधांमुळे पनवेल परिसरातही मागील काही दिवसांपासून कोरोना रुग्ण संख्येत घट दिसून येत असून रुग्ण बरे होण्याचे प्रमाण देखील वाढले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात तसेच पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ क्षेत्राकरीता रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी आदेश पारित केले आहेत. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार आस्थापनांना सशर्त शिथिलता देण्यात आली आहे. यादरम्यान पनवेलमध्ये सर्व अत्यावश्यक वस्तू व सेवांची दुकाने जी सकाळी ७ ते ११ या वेळेत सुरु आहेत ती दुकाने यापुढे सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत सुरु राहतील.

त्याचप्रमाणे सर्व अत्यावश्यक गटात नसलेली व स्टँड अलोन दुकाने (मॉल्स,कॉम्प्लेक्स वगळता) सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत सुरु राहतील. परंतु सदर दुकाने शनिवार व रविवारी पूर्ण वेळ बंद राहतील. आवश्यक वस्तूंच्या बरोबर अन्य वस्तु देखील ई-कॉमर्स माध्यमातून वितरीत करता येतील. दुपारी २ नंतर मात्र वैदयकीय किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीव्यतिरिक्त येण्याजाण्यावर निर्बंध असतील. शासनाच्या दि. १२ मे २०२१ च्या आदेशानुसार होम डिलेव्हरीस यादरम्यान परवानगी असेल. तसेच कोरोनाविषयक कामे करणाऱ्या कार्यालयाव्यतिरिक्त इतर सर्व शासकीय कार्यालये ही २५ टक्के कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरु राहतील. जास्तीची उपस्थितीची आवश्यकता असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या परवानगीने वाढीव उपस्थिती ठेवण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

कृषी क्षेत्राशी संबंधित सर्व दुकाने दुपारी २ वाजेपर्यंत सुरू राहतील. परंतु सदर दुकाने शनिवार व रविवारी पूर्ण बंद राहतील. दुकानांना पुरवठा केल्या जाणाच्या वस्तूंच्या वाहतूकीवर निबंध असणार नाही. मात्र दुकानांना ठरवून दिलेल्या वेळेनंतर ग्राहकांना विक्री करता येणार नाही. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित दुकान आस्थापना यांना शासनाकडील दि. १२ मे २०२१ च्या आदेशानुसार नमूद केलेल्या दंड व्यतिरिक्त कोरोना महामारीची अधिसूचना संपुष्टात येत नाही तोपर्यंत दुकाने बंद ठेवण्यात येतील. सदर प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबाजवणी करून नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कवेळे येथे घाट वळणावर बोअरवेलचा ट्रक पलटी ; एकाचा मृत्यू, ४ जण जखमी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील कवेळे गावाजवळ घाट वळणार , उतारावर बोअरवेलचा ट्रक पलटी होऊन अपघात झाला आहे. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून ४ जण जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पाली पोलीस स्थानकात मंगळवारी (दि.१) पहाटे २:२० ला करण्यात आली आहे.



पाली पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बोअरवेल ट्रक चालक छोटू मुन्नालाल यादव (२८) रा. मध्यप्रदेश हा बोअरवेल ट्रक क्र. एम एच १५ सि. व्ही ०६४३ घेऊन महागाव ते उद्धरमार्गे वाकण असा प्रवास करीत होता, दरम्यान मौजे कवेळे गावच्या हद्दीत घाटाचे वळणावर उतारावर वेगाने चालवीत आला, यावेळी ट्रक रस्त्याच्या बाजूला साईटपट्टी वर उजव्या बाजूला पलटी होऊन अपघात झाला. यावेळी दगडाची हुटी लावण्यासाठी आलेला प्रेमसुखदास गांडीदास पन्हेरीया वय ४० वर्ष रा. मलपठार , मध्यप्रदेश याच्या अंगावर ट्रक मधील ड्रीलिंग रॉड पडून दुखापत होऊन मृत्यू झाला.

तर ट्रक मधील विकास रघुवंशी यास गंभीर दुखापत झाली असून ललित वरकडे, ट्रक चालक छोटू यादव व जयदीपकुमार रघुवंशी यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या अपघातास ट्रक चालक छोटू यादव याला जबाबदार धरून त्याच्यावर पाली पो-लीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघाताची पाली पोलीस स्थानकात नोंद झाली असून अधिक तपास पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. फौजदार एम. डी. बहाडकर करीत आहेत.

# साप उतरवतो म्हणून मजगाव येथील मंत्रिकाने केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

साप उतरवतो असे सांगून फसवणूक केल्याची घटना म्हसळा तालुक्यातील मजगाव येथे घडली आहे.

मजगाव येथील ग्रामस्थ महेंद्र पांडुरंग शिंगारे (वय २६ वर्ष ) मु. मजगाव, गणेश नगर हे आपला भाऊ व पत्नी सह रहातात. दिनांक २९ मे २०२१ रोजी ते त्यांच्या शेतात काम करीत असता त्यांच्या उजव्या पायाला फुरसा या जातीच्या सापाने डंख घेतला. काही लोकांच्या सांगण्यावरून मी माजगाव येथील मंत्रिकाकडे गेलो. मी मंत्र मारलाय तेव्हा आता घाबरण्याचे काही कारण नाही असे सांगून मला घरी जाण्याचा सल्ला दिला.

मात्र दोन दिवसांनी मला खूप अत्यवस्थ वाटू लागल्याने मी म्हसळा येथे ग्रामिण रुग्णालयात जाऊन वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला, त्यांनी मला पुढील उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग येथे उपचारासाठी पाठविले.

मी वेळीच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घेतला नसता तर मी वाचू शकलो नसतो असे शिंगारे यांनी सांगितले. मात्र अश्या भोंदूगिरी करणाऱ्या मंत्रीकांचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांच्यावर कडक कारवाईकरावी अशी अपेक्षा शिंगारे यांनी केली आहे.

# मोकाट गुरे दावणीला बांधा; अन्यथा कायदेशीर कारवाई करून गरजवंतांना द्या

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील पालीत मोकाट गुरांचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे अशा मोकाट गुरांच्या मालकांनी आ-पली गुरे घेऊन जावीत, अन्यथा या गुरांना कायदेशीररित्या ताब्यात घेऊन गरजू शेतकरी व गुराख्यांना देण्यात यावेत अशी मागणी शिवऋण प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन सोमवारी (दि.३१) पाली-सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांना देण्यात आले आहे.

शिवऋण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष केतन म्हसके यांनी सांगितले की सुधागडात पशुपालन व कृषी क्षेत्राशी निगडित व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत असल्याने गुरांचे प्रमाण अधिक आहे, मात्र गुरांवरील नियंत्रण ठेवले जात नसल्याचे दिसून येते. ही मोकाट गुरे बऱ्याच वेळेला अपघाताचे कारण बनतात. आणि स्वतः देखील अपघातात जखमी होतात. तसेच उकिरड्यावरील प्लास्टिक खाऊन त्यांचे आरोग्य बिघडत आहे. त्यामुळे या मोकाट गुरांचा प्रश्न शिवऋण प्रतिष्ठणने मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

यासाठी सुधागड महसूल विभाग, पाली नगरपंचायत व पशुसंवर्धन विभाग पाली पूर्ण सहकार्य करीत आहेत. त्यामुळे अशी मोकाट गुरे ज्या शेतकऱ्याची असतील त्यांनी ती घेऊन जावीत अन्यथा कायदेशीररित्या ही गुरे तालुक्यातील गरजू शेकऱ्यांना नियम अटी यांचे पालन करून देण्यात येतील. असे देखील म्हसके यांनी सांगितले. पाली तहसीलदारांना निवेदन देतेवेळी शिवऋण प्रतिष्ठानचे केतन म्हसके व अमर लहाने उपस्थित होते.

# भागवत सोनवणे पनवेलचे नवे सहाय्यक पोलीस आयुक्त

## पनवेल विभागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कटिबद्ध : भागवत सोनवणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई पोलीस आयुक्त, सह आयुक्त, पोलीस उपायुक्त तसेच सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या सहकार्याने पनवेल परिसरामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी सदैव कटिबद्ध राहीन असे प्रतिपादन पनवेलचे नवे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांनी केले. ते पनवेल येथे सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयाचा पदभार स्वीकारताना बोलत होते. पनवेलचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन-भोसले पाटील यांच्या सेवाकार्याचा कालावधी संपल्याने सोमवारी ते सेवानिवृत्त झाले. त्यानंतर पनवेल येथील सहाय्यक पोलीस आयुक्त पदाचा पदभार त्यांनी नवे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केला.

भागवत सोनवणे यांनी यापूर्वी मुंबई, नागपूर, नाशिक, नांदेड, जालना, बुलढाणा, अमरावती तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणी पोलीस विभागात अत्यंत तत्परतेने व प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावले आहे. अल्पावधीतच त्यांनी अनेक प्रकरणांचा यशस्वीरीत्या तपास केल्याने त्यांच्या कामगिरीबद्दल अनेकवेळा वरिष्ठांनी त्यांचे कौतुकही केले आहे.

गेली ३३ वर्षे, ११ महिने व १६ दिवसांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावरून नितीन भोसले पाटील हे पोलीस खात्यातून सेवानिवृत्त झाले. कोल्हापूर या त्यांच्या मूळ गावातुन ते पोलीस खात्यात भरती झाले. त्यांच्या कारकिर्दीत मुंबई, नवी मुंबई, पुणे शहर, पुणे ग्रामीण, अमरावती, सोलापूर, सांगली या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी नितीन भोसले-पाटील यांनी पोलीस विभागात सेवा बजावली आहे. अत्यंत प्रेमळ आणि मनमिळाऊ स्वभाव; परंतु वेळ पडल्यास गुन्हेगारीबाबत कर्तव्यकठोरता.! अशी नितीन भोसले पाटील यांची पोलीस विभागात विशेष ओळख होती.

पनवेलमध्ये सहाय्यक पोलीस आयुक्तपदी कार्यरत असताना अत्यंत कमी वेळात त्यांनी अनेक प्रकरणांचा छडा लावला. गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. कोरोनाच्या काळात वृद्धाश्रम, अनाथ आश्रम, गोर-गरिबांसाठी वेळोवेळी दिलेला मदतीचा हात तसेच त्यांनी केलेले समाजोपयोगी कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, पोलीस सहआयुक्त डॉ.जय जाधव, परिमंडळ-२चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले पाटील यांच्या भावी आयुष्यासाठी आणि नवे सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दरम्यान सोमवारी संध्याकाळी सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयात नितीन भोसले पाटील यांना निरोप देण्यासाठी तसेच भागवत सोनवणे यांचे स्वागत करण्यासाठी कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, कोपरखैरणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप तिदार, सिबीडी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

३३ वर्षांच्या कालावधीत सेवा बजा-वताना उत्तम वरिष्ठ अधिकारी लाभले हे माझे भाग्य समजतो. मला वेळोवेळी सर्व सहकाऱ्यांनी चांगले सहकार्य केले त्यांचेही आभार मानतो. वरिष्ठांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे कर्तव्य बजावताना मोलाची साथ मिळाली. माझ्यासोबत काम केलेले सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी नेहमीच मला समजून घेतले आणि साथ दिली त्यामुळे सेवानिवृत्त होताना समाधान वाटत आहे. तसेच माझ्या कुटुंबाने मला वेळोवेळी साथ दिली त्यांचेही मनापासून आभार मानतो.

**नितीन भोसले पाटील (सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल)**

पनवेल विभागात गुन्हेगारी प्रवृत्तीला ठेचण्यासाठी सदैव कटीबद्ध राहीन. पन-वेल परिसरामध्ये शांतता आणि सुव्यवस्था कशा पद्धतीने टिकून राहील यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहीन. वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांनुसार कर्तव्य बजावताना कोणावरही अन्याय होणार नाही. सर्व नागरिकांनी निर्भयपणे राहावे. सर्व नागरिकांच्या रक्षणासाठी पोलीस प्रशासन सदैव तत्पर आहे.

**- भागवत सोनवणे (सहाय्यक पोलीस आयुक्त,पनवेल)**

# वीज कामगारांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा द्या : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यामधील वीज कामगार, वीज अभियंते, अधिकारी व कंत्राटी कामगार यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देणेसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



या संदर्भात दिलेल्या त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, राज्यातील सुमारे १६ कोटी जनता व सुमारे २ कोटी ८८ लाख वीज ग्राहकांना वीज पुरवठा मिळेल यादृष्टीने राज्यातील सुमारे ८६००० वीज कामगार, अभियंते, अधिकारी व कंत्राटी कामगार अहोरात्र झटत आहेत. मार्च २०२० पासूनच्या लॉकडाऊन पासून आजपर्यंत कोरोना साथीच्या कालावधीत वीज पुरवठयावर अतिशय भार पडलेला आहे. कोव्हिड रूग्णालये यांना अखंड वीज पुरवठा करण्याचे काम हे वीज महामंडळातील सर्व कर्मचारी, अधिकारी अहोरात्र करीत आहेत. राज्याला फैयान व तौक्ते चक्रीवादळाने दिलेल्या तडाख्यामध्ये तसेच मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भामधील अतिवृष्टीच्या कालावधीमध्ये वीजवाहक झाडांची मोडतोड होऊन बरेच वेळा वीज पुरवठा खंडीत झालेला वीजपुरवठा सुरू करण्यासाठी या कर्मचाऱ्यांनी प्रसंगी आपला जीव धोक्यात घालून युध्द पातळीवर काम केले आहे, याची आपणास कल्पना आहेच.

राज्यातील विद्युत महामंडळाच्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांच्या सेवा अत्यावश्यक गणल्या जात आहेत. तथापि, पोलीस व आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा दिला गेलेला नाही. पोलीस व आरोग्य विभागातील कर्मचारी यांचे तुलनेत वीज महामंडळातील कर्मचाऱ्यांचे काम देखील तेवढेच महत्वाचे आहे. त्यामुळे वीज महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या, अधिकाऱ्यांच्या, अभियंत्यांच्या कामाचे महत्व विचारांत घेवून त्यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा बहाल करावा व त्या अनुषंगाने वीज कर्मचारी व त्यांचे कुटूंब यांचे लसीकरण, मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांना देय आर्थिक लाभ देण्याचा तातडीने विचार व्हावा अशी वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंते संघटना संयुक्त समिती यांनी मागणी केली आहे, त्यानुसार योग्य ती कार्यवाही व्हावी, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले आहे.

# मुरुड तालुक्यातील रुग्ण संख्या वाढत असल्याने कोर्लई, निडी गाव प्रतिबंधित क्षेत्र तर राजपूरी व एकदरा गावात स्क्रिनिंग तपासणी

## कोरोना हद्दपार करण्यासाठी जनतेचे सहकार्य आवश्यक : तहसीलदार गमन गावित

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन शासनाने राज्यात व जिल्ह्यात निर्बंध लागू करण्यात आले असून लॉकडाऊन पंधरा जून पर्यंत करण्यात आला आहे. दुस-या लाटेचा प्रभाव तालुक्यात दिसून येत असून रुग्ण संख्या लक्षात घेऊन तालुक्यातील कोर्लई, निडी गाव प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे तसेच राजपूरी व एकदरा गावात रुग्ण संख्या वाढत असल्याच्या संशयावरून, तक्रारीवरून उपाययोजना दोन्ही गावांची स्क्रिनिंग तपासणी करण्यात आली असल्याची माहिती तहसीलदार गमन गावित यांनी दिली असून तालुक्यातून कोरोना रोगाचे उच्चाटन करण्यासाठी जनतेने सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

कोरोना जागतिक महामारीच्या पार्श्र्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन तालुक्यातील कोर्लई निडी व राजपूरी भागात तहसीलदार गमन गावित यांनी भेट देऊन पाहणी केली तसेच उपाययोजना म्हणून कोर्लई, निडी गाव प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले.राजपूरी व एकदरा गावात रुग्ण संख्या वाढत असल्याच्या संशयावरून तक्रारीवरून दोन्ही गावांची स्क्रिनिंग तपासणी करण्यात आली असून कोरोना बाबत माहिती देण्यात येऊन तालुक्यात अन्यत्र या रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसमितीने दक्षता घ्यावी व जनजागृती करावी.असे सुचित केले.

लग्न कार्यात कोविड रुग्ण संख्या वाढत असल्याचे समोर आले असल्याने तालुक्यातील गावातील लोकांनी हळदी-लग्न समारंभ साजरे करताना हळदीचा कार्यक्रम रद्द करावा.तालुक्यातील रुग्ण संख्या आटोक्यात आणण्यासाठी कोरोना हद्दपार करण्यासाठी जनतेने सहकार्य करण्याचे आवाहन तहसीलदार गमन गावित यांनी केले आहे.

# उरण - मोरा रस्त्याला मोठे भगदाड; नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपालिका हद्दीतील उरण मोरा रस्त्यावरील मोरा भवरा येथील भर रस्त्यात डांबरीकरण खचून मोठे भगदाड पडले आहे. यामुळे अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकडे उरण नगरपालिकेला लक्ष देण्यास सवड नसल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे.

उरण शहरातील आनंदनगर पासून ते मोरा एनएडी पर्यंतचा भाग उरण नगरपरिषद हद्दीमध्ये येत आहे. येथील रस्ते ही नगरपरिषदेच्या माध्यमातून साकारले जात आहेत. एमएमआरडीए नगरपालिकेने फक्त हनुमान कोळीवाडाच्या पेट्रोल पंप पर्यतच कॉंक्रीट रस्त्याचे काम केले आहे .त्यामुळे पुढील रस्त्याचे काम केले नसल्याने या भवरा ठिकाणी खड्डे पडले आहेत.

एक दोन ठिकाणी रस्ता खचला असून मोठे भगदाड पडले आहे. पावसामुळे भगदाडाच्या खालून संपूर्ण रस्ता खचला जाऊ शकतो. रस्ता कॉंक्रेटचे काम गेली ३ ते ४ वर्षे सुरू असूनही आजतागायत पूर्णत्वास गेलेले नाही. याचे सोयरसुतक ना एमएमआरडीए अथवा नगरपालिकेला नसल्याचे दिसते. तसेच इतर अनेक उपक्रम हाती घेऊन त्याचे उदघाटन थाटामटात केले आहेत. पण बहुतांश कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. याबाबत ना सत्ताधारी, ना विरोधक यांचे दुर्लक्ष होत असल्याने जनतेत नाराजीचा सूर निघत आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## राहत्या घरातून दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातील बेडवर ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची बॅग अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे. कामोठे वसाहतीमध्ये राहणार्या भाविका चित्रोडा यांनी त्यांना मुळगावी जायचे असल्याने काही कपड्यांसह सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास ४५ हजार रुपये इतकी आहे हे घरातील बेडवर बॅगेत भरण्यासाठी ठेवले असता सदर दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दुचाकीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बिल्डिंगच्या पार्किंगमधून ९० हजार रुपयांच्या दुचाकीची चोरट्यांनी चोरी केली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाईन आळी येथे राहणारे अनिल दगडू भालेराव यांच्या मुलाने श्रेया वल्लभ बिल्डिंगच्या पार्किंग मध्ये दुचाकी एमएच ४६ बीटी ७५४८ पार्क केली होती. चोरट्याने या गाडीची चोरी केली आहे.

## रोख रक्कम आणि दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली आहे. खारघर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सीआयएसएफ येथे निरीक्षक पदावर काम करणारे अविनाश अमर हे खारघर सेक्टर ३५ डी येथे राहतात. ते मुंबई येथे कामासाठी गेले होते. कामावरून परत आल्यानंतर त्यांना त्यांच्या दरवाज्याचा लॉक तूटलेला दिसला. यावेळी चोरट्यांनी ३५ हजार रुपये किमतीच्या सोन्याच्या अंगठ्या, मोबाईल आणि पाच हजार रुपये चोरून नेले.

## हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आदई गाव ग्रामपंचायतीच्या पुढे मराठी शाळेच्या बाजूला मोकळ्या जागेत सुमित जोशी (वय ३५) हा इसम बेकायदेशीरपणे प्रतिबंधित असा गुटखा, पान मसाला, तंबाखू या पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

त्यानुसार या ठिकाणी छापा टाकला असता एक इसम हातात पांढर्या रंगांची प्लास्टिक गोणी घेऊन बसलेला दिसला. पोलिसांनी सुमित जोशी याला ताब्यात घेतले व त्याच्याकडून हजारो रुपये किमतीचा गुटखा, पान मसाला जप्त केला.

# भुमीपुजन कार्यक्रमास आलेल्या पालकमंत्री यांनी दिव्यांग विठ्ठलची केली आस्थेने विचारपूस

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

राज्यमंत्री तथा रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते सोमवार दि. ३१ मे रोजी सायंकाळी ०४. ०० वाजता माणगांव उतेखोल गांव येथील जावयाची वाडी व त्याआधी जुने माणगांव येथील राष्ट्रीय महामार्ग ते बौध्दवाडी (विश्राम गृह) कडे जाणाऱ्या रस्त्यांचे भुमीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी त्यांचे सोबत प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर, तहसिलदार प्रियंका आयरे, पोलीस निरिक्षक अश्वनाथ खेडकर, कॉंस्टेबल श्रेयस म्हात्रे तसेच राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, महिला तालुका अध्यक्षा संगीता बक्कम, माणगांवच्या नगराध्यक्षा योगिता चव्हाण, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, सर्व नगरसेवक, नगरसेविका व राष्ट्रवादीचे सर्व पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.



उतेखोल कार्यक्रम स्थळी पालकमंत्री आ-पले वाहन दुरवर उभे करुन गांवातील कच्च्या रस्त्यावरुन पायी चालत येत असताना एका ठिकाणी उतेखोल गावातील दिव्यांग तरुण विठ्ठल उर्फ विठोबा मारुती जाधव हा आपल्या घराजवळुन दोन्ही हातांच्या पंज्यांचे आधारे बसलेल्या अवस्थेत पालकमंत्री यांच्या दिशेने साद घालीत सरकत सरकत पुढे येत असल्याचे पाहुन पालकमंत्री आदिती यांनी स्वतः पुढे जात त्याची आपुलकीने चौकशी करीत काय मदत हवी आहे का ? असे विचारले असता, विठ्ठलने स्वतःला स्वावलंबीपणे इकडे तिकडे जाता येण्यासाठी शासना कडुन अपंग व्यक्ती साठीची तिनचाकी सायकलची गरज असल्याचे सांगितले. हे ऐकताच ना. कु. आदिती तटकरेंनी त्या दिव्यांगास तेथेच बसायला सांगितले.

या अनपेक्षित प्रसंगाने उपस्थितांना या दिव्यांग तरुणाचे पालकमंत्री यांचेशी नेमके काय संभाषण झाले असावे ! याचे कुतुहल वाटले. पालकमंत्री तेथुन पुढे जात रस्त्याचे भुमीपुजन कार्यक्रम स्थळी पोहचल्या, आणि भुमीपुजन उरकुन पुन्हा आपल्या गाडीकडे येताना दिव्यांग तरुण जिथे बसला होता त्याठिकाणी परत आल्या व त्यांनी या दिव्यांगास क्षणाचाही विलंब न लावता दहा दिवसाचे आत तिनचाकी सायकल मिळवुन देणार असे सांगत आश्वस्त केल्याचे प्रत्यक्षात या विठ्ठलने आमचेशी संवाद साधत म्हटले आहे. तसेच गेले अनेक वर्षात इतक्या आपुलकीने कोणत्याही लोकप्रतिनीधीने माझी साधी विचारपुसही केली नाही ! असेही त्याने म्हटले आहे. मात्र पालकमंत्री आदिती तटकरे जनतेशी इतक्या सहजतेने संवाद साधतात म्हणुनच सर्वसामान्यांना त्या जवळच्या वाटतात अशी प्रतिक्रिया माणगांवकरांमधुन व्यक्त होत आहे.

## श्रीवर्धनमध्ये कोरोना रुग्णांचा आलेख उतरता होतोय, नागरिकांना दिलासा

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

काल सायंकाळी प्राप्त झालेल्या कोरोना अहवालानुसार गेल्या पंधरा दिवसात प्रथमच फक्त चार रुग्ण पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले आहे. नाहीतर मागील पंधरा दिवसांपासून रोज दहा, सतरा, वीस रुग्ण सापडत होते. मात्र यावेळी कोरोना रुग्णांचा मृत्यू दर वाढल्याचे पाहायला मिळत आहे. मे महिन्यात जवळ-जवळ सतरा ते अठरा जण कोरोनामुळे मृत झाले. प्रशासनाने शेतकऱ्यांना बी - बियाणे, खत खरेदी करण्यासाठी दुकाने जास्त वेळ उघडून ठेवण्यासाठी वेळ वाढवून दिल्याने शेतकरी वर्गा मधून प्रशासनाचे आभार व्यक्त होत आहे. येत्या आठ दिवसांवरती पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतीची मशागतीची कामे त्याच प्रमाणे पेरण्या देखील सुरू केल्या आहेत. आत्तापर्यंत श्रीवर्धन तालुक्यात एकूण ९८० कोरोना बाधित रुग्ण सापडले, तर कालच्या दिवशी चार रुग्ण कोरोना बाधित सापडले. सध्या तालुक्यातील विविध ठिकाणी १३७ रुग्ण उपचार घेत आहेत, तर एकूणपन्नास जणांचा आत्तापर्यंत मृत्यू झाला आहे. तर ७९४ रुग्ण आणि कोरोनावर पूर्णपणे मात करून आपल्या घरी गेलेले आहेत. सध्या श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयामध्ये २४ रुग्ण उपचार घेत आहेत. त्याचप्रमाणे आराठी येथील कोविड केअर सेंटरमध्ये आठ रुग्ण उपचार घेत आहेत, तर तीन रुग्ण खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेत आहेत, तर १०२ रुग्ण घरीच विलगीकरणा मध्ये उपचार घेत आहेत. घरीच विलगीकरणा मध्ये असलेले रुग्ण जास्त जास्त प्रमाणात असल्याने त्यांच्यावरती लक्ष ठेवणे अतिशय बंधनकारक आहे. खेडेगावांमध्ये ग्रामसेवक किंवा तलाठी यांसारख्या गावच्या लेव्हलला काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी विलगीकरणात असलेल्या रुग्णांवर लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. जर विलगीकरणात ठेवलेले रुग्ण अन्यत्र फिरले तर कोरोना रुग्ण संख्येत वाढ होऊ शकते. लवकरच श्रीवर्धन तालुक्यातील कोरोना रुग्णांवरती नियंत्रण मिळवून कोरोना श्रीवर्धन मधून हद्दपार होईल अशाप्रकारे नागरिकांसह सर्व प्रशासकीय यंत्रणांनी काम करणे आवश्यक आहे.

## जेएनपीटी अंतर्गत बंदरातून रुग्णांच्या उपचारासाठी ४१ मेट्रिक टन ग्रेड ऑक्सिजनच्या साठयाचे वितरण

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी अंतर्गत एपीएम आणि जीटीआय याा दोन खासगी बंदरात काल ४१ मेट्रिक टन मेडिकल ग्रेड ऑक्सिजनचा साठा उतरविण्यात आला आहे.

जेएनपी-एपीएम टर्मिनलमध्ये मेडिकल अॅ.क्सेसरीज स्पिंडल वाल्व असलेले ऑक्सिजनचे २५० सिलेंडरचा साठा उतरविण्यात आला आहे.१९.५० मे.टनाचा साठा वान हाई लाइन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून आयात करण्यात आला आहे.

जेएनपी-जीटीआय टर्मिनल बंदरातुनही जलवाहिनीतील क्रॉजेनिक कंटेनरमध्ये भरलेल्या १९.५० मेट्रीक टन वैद्यकीय ग्रेड ऑक्सिजनचा साठा उतरविण्यात आला आहे.वैद्यकीय ग्रेड ऑक्सिजनचा वापर सद्यस्थितीवरील कोवीड - १९



साथीच्या आजारावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.त्यामुळे बंदरात उतरविण्यात आल्यानंतर मेडिकल ग्रेड ऑक्सिजनचा साठा तात्काळ आवश्यक ठिकाणी रवाना करण्यात आला आहे.

सध्याच्या लँडिक सिट्युटेशनवर मात करण्यासाठी महाराष्ट्रातील रूग्णालयात ऑक्सिजन सिलेंडर आणि ऑक्सिजन नियामकांचे मोठ्या प्रमाणात वितरण केले जाते. जेएनपीटीनेही आता पर्यंत एकूण ३६९.९९४ एमटी कोविडशी संबंधित वैद्यकीय साधनसामग्री आणि वैद्यकीय ग्रेड ऑक्सिजनचा पुरवठा केला असल्याची माहिती जेएनपीटी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## कळंबोलीत रेशन किटचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग ०८ मधील सनशाईन सोसायटी, पंचशीला सोसायटी, पंचवटी सोसायटी, पंचरत्न सोसायटी, आशिष सोसायटी, शारदा सोसायटी, सरोवर सोसायटी येथील जनतेला एक मदतीचा हात म्हणून अन्न धान्य वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी नगरसेवक बबन मुकादम, नगरसेवक अमर पाटील, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, नगरसेविका प्रमिला पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती प्रिया मुकादम, भाजप कार्यकर्ते शित्तू शर्मा, प्रकाश शेलार, कमल कोठारी, अमर ठाकूर, जमीर शेख यांच्या हस्ते रेशन किटचे वाटप झाले.

## नवीन पनवेल येथे नवीन कोविड लसीकरण केंद्र सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेमध्ये नवीन पनवेल येथे आज (१ जून) शासकीय कोविड १९ लसीकरण केंद्राचे उदघाटन महानगरपालिकेचे आयुक्त श्री. सुधाकर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेचे संचालक डॉ. दीपक राऊत हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

आरोग्य मंत्रालय, भारत सरकारच्या, राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या नवीन पनवेल येथील शहरी आरोग्य केंद्रात आज दिनांक ३१ मे २०२१ पासून पनवेल महानगरपालिकेच्या सहकार्याने कोविड लसीकरण केंद्राची सुरुवात करण्यात आली. हे लसीकरण केंद्र, राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेच्या, प्लॉट नं ६ ६ए, सेक्टर १८, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ जीओमेग्रेटीझम जवळ, आसुडगाव बस डेपो समोर, नवीन पनवेल येथे असून, या केंद्रात सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४ या वेळात लसीकरण केले जाणार आहे. लसीकरण केंद्राच्या माध्यमातून खांदा कॉलनी, धाकटा खांदा, कळंबोली, कामोठे, मोठा खांदा आणि पनवेल परिसरातील नागरिकांना लवकर लसीकरण मिळणार आहे. या साठी राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थेचे उपायुक्त डॉ.धवल थोरात, अतिरिक्त संचालक डॉ एन आर के बेहेरा, डॉ. सुपर्णा खेरा, मुख्य चिकित्सा अधिकारी(एसएजी), तसेच एनआयपीएचटीआर चे सहसंचालक डॉ. सुधीर वंजे, महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, आदी उपस्थित होते.

## शिवसेना पेण तालुकाप्रमुख अविनाश म्हात्रे यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पेण**

शिवसेनेचे पेण तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे यांच्या मातोश्री प्रमिला जगन्नाथ म्हात्रे यांचे अल्पशा आजाराने नवी मुंबई येथील अपोलो हॉस्पिटल येथे दुःखद निधन झाले. त्या ६९ वर्षाच्या होत्याव. त्यांच्या पश्चात पती जगन्नाथ, ३ मुले अविनाश, प्रदीप, संदेश, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रमिला म्हात्रे यांच्या सुनबाई प्रतिभा अविनाश म्हात्रे या बोरी गावच्या सरपंच आहेत. गाव स्वच्छता मोहिमेकरिता त्यांना प्रमिला म्हात्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभायचे.



प्रमिला म्हात्रे यांनी कराड येथे शिक्षण घेतल्यानंतर पेण तालुक्यातील वडखळ विभागातील बोरी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करायला सुरुवात केली. त्यांनी रायगड जिल्ह्यात शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून त्यांनी ३५ वर्ष काम केले. पेण तालुक्यातील मसद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक या पदावरून त्या निवृत्त झाल्या. शिस्तप्रिय, प्रेमळ स्वभाव व स्वच्छता प्रेमी म्हणून त्यांची छबी होती.

पेण, कर्जत, अलिबाग तालुक्यातील विद्यार्थ्यांना त्यांनी शिक्षणाचे धडे दिले. त्यांच्या हाताखाली शिकलेले अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर, चार्टर्ड अकाउंटंट, तसेच उच्च पदांवर शासकीय अधिकारी झाले आहेत. या पैकी अनेक विद्यार्थी दरवर्षी गणपती उत्सवादरम्यान प्रमिला म्हात्रे यांचा आशीर्वाद घेण्याकरिता यायचे. प्रमिला म्हात्रे यांच्या निधनाचे वृत्त समजताच माजी केंद्रीय अवजड मंत्री अनंत गिते यांनी म्हात्रे कुंटुबाशी संपर्क साधुन संवेदना व्यक्त केल्या. रायगड जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी तसेच प्रतिष्ठित नागरिकांनी म्हात्रे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

## वाढत्या रुग्णसंख्येमुळे तळा बाजारपेठ दोन वाजेपर्यंतच सुरू

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे बाजारपेठ सकाळी सात ते दोन वाजेपर्यंत सुरूठेवण्याचा निर्णयप्रशासनाकडून घेण्यात आला आहे. गेल्या वर्षीपासून १८४ वर विसावलेला कोरोना रुग्ण संख्याकासवगतीने वाढत जाऊन ३४९ पोहोचली आहे. १ मे २०२१ रोजी २५३ वर असलेली संख्या ३१ मे २०२१ रोजी ३४९ झाली आहे. तब्बल ९६रूग्ण वाढले असुन २० मृत्यू पावलेल्या ची संख्या झाली असून मृत्यू दर वाढला आहे. त्यामुळे निश्चितच भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यात सर्वात कमी कोरोना रुग्णांची संख्या आहे. परंतु मागच्या काही दिवसांपासून शहरात मोठ्या प्रमाणावर कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने तळा तालुक्यासाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे. तसेच गेल्या काही दिवसांपासून कोरोना रुग्णांचे मृत्युदर सुद्धा वाढले आहेत. या कारणाने तळा बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनी मोजक्याच वेळेत दुकाने उघडी ठेवण्यासाठी दि. १ जून रोजी मिटिंग बोलावली होती

परंतु जिल्हाधिकारी कार्यालया कडून दुकाने दोन वाजे पर्यंतच उघडी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने तळा नगरपंचायत मार्फ़त व्यापाऱ्यांना दुकाने दोन वाजता बंद करण्याची सूचना माईकद्वारे देण्यात आली. व्यापाऱ्यांनी त्या आदेशाचे पालन करीत दुपारी दोन वाजता तळा बाजारपेठ पूर्णपणे बंद केली.

प्रोसेस जमा रु.५०/- वकील : अभिषेक गोखले

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.मुजावर साहेब दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
चौ.अ.क्र.६३६/२०२०
नि.क्र.६/ड
ने.ता.२९/७/२०२१

श्रीमती.शिवानी एस.काळे
मु.१०१, west virginia, off caesar road
Amobli, Andheri West, Mumbai-400058 अर्जदार

अर्जदार यांचे वडील कै.शिवाजी एस.सिंग यांचे दि.२६/०२/२०१३ रोजी मौजे : हजोली उत्तर प्रदेश येथे निधन झाले असून, सदर मयताच्या नावे Probate (विल) दाखला मिळण्याकामी अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या Probate दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला दिला जाईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१ माहे ०६ २०२१ रोजी माझे सहीने दिले.

सही/- लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : केवाळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचे मालक काळुराम जोमा खुटले यांचेकडून आम्ही कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आाहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : केवाळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| जमीन मालकाचे नाव | गट क्रमांक / उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| काळुराम जोमा खुटले | ५९/१/क | ०.२२.५० पैकी विक्री क्षेत्र ०.०६.०० | ३.६४ |

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे/खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१०/०५/२०२१

**सही/-**
**श्री.मुकेश अशोक निधान**
**२०३, त्रिमुर्ती सिद्धार्थ को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.५२, सेक्टर ३०, ओवे, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९७६९७९९४०५**

वकील : ॲड.सचिन अं.म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अ.क्र.५२१/२०२१
नि.क्र.८/ड
ने.ता.३/७/२०२१

१) श्रीमती.सुचिता सुरेश पाटील
वय : ६१ वर्षे, व्यव : गृहिणी
२) कै.पंकज सुरेश पाटील मयत वारस
२/१) श्रीमती.कृपाली पंकज पाटील
वय : ३६ वर्षे, व्यव : गृहिणी
२/२) कु.चैत्राली पंकज पाटील
वय : १२ वर्षे, व्यव : शिक्षण
२/३) कु.क्रिशल पंकज पाटील
वय : ०८ वर्षे, व्यव : शिक्षण
सर्व रा.शिवगंगा सोसायटी, शिवमंदिर समोर,
अे/९/१०, अे टाईप सेक्टर-१३, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
अर्जदार नं.२/२ व २/३ यांची अज्ञान पालनकर्ती
आई म्हणून अर्जदार नं.१ अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, कै. सुरेश नामा पाटील यांचा मृत्यू दि.२३/०९/२०२० रोजी सुखम हॉस्पिटल करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून, त्यांचे खालील मिळकती बाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**शिवगंगा सोसायटी, शिवमंदिर समोर,**
**अे/९/१०, अे टाईप, सेक्टर १३,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती ही कै.सुरेश नामा पाटील यांच्या नावे असून ते आज रोजी हयात नाहीत म्हणून अर्जदार हे त्यांचा वारसदाखला मिळण्यासाठी सदरचा दिवाणी चौकशी अर्ज दाखल करीत आहेत.

वरील अर्जदार हे कै.सुरेश नामा पाटील यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/६/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# देवदूत
## लोकनेते रामशेठ ठाकूर

**पृष्ठ १ वरुन..**

करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्या अनुषंगाने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षणासाठी मदत करण्यात येते. आज हि मदत घेऊन हजारो विद्यार्थी उच्च शिक्षित होऊन कुणी पायलट तर कुणी इंजिनिअर, आर्किटेक्ट होऊन स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत.

रयत शिक्षण संस्था हि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची मातृसंस्था राहिली आहे. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था असतानाही त्यांनी झुकते माप रयतला दिले. आज ते रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आहेत. पण ते स्वतः ला रयत सेवक समजून काम करीत असतात. रयत शिक्षण संस्थेच्या अनेक शाखांच्या उभारणीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा खारीचा नाही तर सिंहाचा वाटा आहे. रायगड जिल्हयातील विद्यालयांसह महाराष्ट्रातील अनेक शाखांना नवसंजीवनी देण्याचे काम त्यांनी निस्वार्थीपणे केले आहे. त्यामुळे त्यांच्या नावाचे 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' साताऱ्यात उभारले जात आहे. हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचाच गौरव नाही तर पनवेल,उरण, रायगडचा सन्मान आहे.

स्थानिक, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या लढ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच अग्रभागी राहून काम केले आहे. दिवंगत दि. बा. पाटील, थोर



समाजसुधारक जनार्दन भगत यांच्या प्रेरणेने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच सर्व समाजासाठी काम केले. दिबांसाहेबांच्या लढ्यात त्यांनी हिरहिरीने सहभाग घेतला आहे. दि. बा. पाटीलसाहेब प्रकल्पग्रस्तांचे दैवत आहेत त्यांनी प्रकल्पग्रस्त गावांच्या विकासासाठी सर्वस्व अर्पण केले आणि त्याच भावनेतून आणि आदरातून लोकनेते रामशेठ ठाकूर काम करताना दिसतात. सध्या नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांचे कैवारी दि. बा. पाटील यांचेच नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे, हि ठाम भूमिका मांडत सातत्याने प्रयत्नशील राहून सर्वपक्षीय कृती समितीची चळवळ वृद्धिंगत केली आहे. काहीही होवो दिबासाहेबांचेच नाव हि भूमिका घेऊन एल्गार पुकारला आहे. जेएनपीटी सिडको प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याच्या भूमिकेतून लोकनेते रामशेठ ठाकूर यांची आग्रही भूमिका महत्वाची ठरली. प्रकल्पग्रस्तांच्या हक्कासाठी दिवंगत दि. बा. पाटील यांच्या आशिर्वादाने त्यांनी सतत ठाम भूमिका मांडली. वेळोवेळी झालेल्या बैठक, मोर्चे, आंदोलनामध्ये त्यांनी ताकद दाखवून दिली. सिडकोने विविध प्रकल्पांसाठी जमिनी संपादित केल्यानंतर गावांच्या सीमारेषेवर ताबा घेण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी वेळोवेळी होत राहिलेल्या सिडकोच्या सर्वेक्षणाला तसेच बांधकाम तोडणीला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कडाडून विरोध केला. गावठाणाच्या चारही बाजूला २०० मीटर जागा गावासाठी सोडण्याचा ठाम आग्रह केला. नैसर्गिक गरजेपोटी बांधललेली घरे नियमित करा असा आवाज उठवून तशी तरतूद करण्यास शासनाला भाग पाडण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला. त्याचबरोबर सिडको हद्दीतील गावांचा विकास झाला पाहिजे यासाठी सिडकोने गावांना विकासनिधी द्यावा हा आग्रह लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी धरला आणि त्या माध्यमातून गावांना विकासनिधी मिळत आहे. त्यामुळे गावांच्या विकासात त्यांचे मोलाचे योगदान मानले जाते. स्थानिक प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याची त्यांची भूमिका कायम राहिली, त्यामुळे न्हावा शिवडी सागरी सेतू प्रकल्पात बाधित होणार्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची आग्रही मागणी करण्याबरोबरच त्या संदर्भातील पाठपुरावा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केला आणि त्यातून मच्छीमारांना भरपाई मिळाली.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना आणि त्या अनुषंगाने विद्यालये, महाविद्यालयांची अर्थात सर्वसुविधांयुक्त विद्येची पंढरीची उभारणी झाली. विविध प्रकारचे शिक्षण दानाचे काम होत असताना स्थानिक विद्यार्थ्याला विधी शिक्षण घेण्यासाठी मुंबई -पुणे शिवाय पर्याय नव्हता. याची दखल घेत त्यांनी भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाची स्थापना केली आणि त्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना विधी चे उच्च शिक्षण घेणे सोयीस्कर झाले. आणि या शिक्षणातून वकिलांची फौज तयार होत आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी लावले. त्यामध्ये खारकोपर रेल्वे स्टेशनचा प्रश्नही तेवढाच महत्वाचा आहे. उलवा परिसरात झपाट्याने विकास होत असताना रेल्वे साधन प्रलंबित राहिली, त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तत्कालीन केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभू यांच्याकडे पत्रव्यवहार व पाठपुरावा केला. त्या अनुषंगाने खारकोपर सोबत रेल्वे स्थानक इतर स्टेशनची निर्मिती होऊन त्याचा फायदा या परिसरातील नागरिकांना होत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे निवासस्थान म्हणजे लोकांच्या समस्या सोडविणे, त्यांना आर्थिक मदत देणे यासाठी प्रसिद्धच आहे. पण त्यांनी हे कार्य करतानाच पनवेल शहरासह खांदा कॉलनी, कामोठे, खारघर, उलवा नोड, तळोजा, कळंबोली अशा विविध ठिकाणी जनतेच्या सेवेसाठी पक्षाचे जनसंपर्क कार्यालये उभारली. या कार्यलयांच्या माध्यमातून नागरिकांचे समस्या सोडविण्याचे, आणि मार्गदर्शन व मदत करण्याचे काम होत आहे.



महिला वर्गातून छोटे मोठ्या उद्योजिका निर्माण व्हावेत, यासाठी रोजगार प्रशिक्षण मोहिम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आली. त्या माध्यमातून अनेक महिलांनी स्वतःचा रोजगार सुरु केले. तसेच रोजगार मेळाव्याचे आयोजन करून आजपर्यंत हजारो तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. अपंगत्वावर मात करण्यासाठी कृत्रिम हात व पाय बसविण्याचे शिबीर अर्थात जयपूर फूट कॅम्पचे मोठ्या प्रमाणात आयोजन करून हजारो अपंग व्यक्तींना त्यांच्या पायावर उभे करण्याचे काम त्यांनी केले. दरवर्षी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबीराचे आयोजन करून सर्वसामान्यांना आरोग्यदायी जीवनाची भेट देण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिबिरात दरवर्षी किमान १५ हजार नागरिक लाभ घेत असतात. त्यामुळे आजपर्यंत लाखो जणांना या उपक्रमाचा लाभ झाला. गोर गरीब विद्यार्थ्याने शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे या हेतून त्यांनी तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील विद्यालयातील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी जवळपास ०२ लाख वह्यांचे वाटप केले जाते. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या स्थापनेपासून हा उपक्रम अविरतपणे सुरु आहे. अशी एक ना अनेक कामे लोकनेते रामशेठ ठाकूर सतत करीत आहेत.




लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ७० वा वाढदिवस. ते सुद्धा ज्येष्ठ नागरिकांमध्ये मोडत असले तरी त्यांचे कार्य एवढे अफाट आहे कि, आजही ते अगदी युवकांच्या एनर्जीप्रमाणे सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात स्वतः ला झोकून देऊन काम करतात. स्वतःचे वय ७० असले तरी ते कधीही ज्येष्ठ नागरिकांना विसरत नाहीत कारण ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान हा त्यांच्या हृदयाचा एक कप्पा आहे. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गरजूंच्या मदतीसाठी कधीही राजकारण केले नाही. सदैव आपल्याकडून कशी मदत होईल याचाच त्यांनी विचार केला. त्यामुळे लोकांवर आलेले कोणतेही संकट असो ते आपले आहे असे मानून लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून काम करीत आले आहेत. महापूर असो वा कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच मदतीतून सर्वसामान्यांना आधार दिला आहे. कोरोना वैश्विक महामारीच्या काळात नागरिकांना तन-मन-धनाने मदत करत देवदूताप्रमाणे त्यांनी प्रामाणिक कार्य केले. त्यामुळे कोरोनाच्या आव्हानात्मक काळातही कोरोनावर मात करण्यासाठी मोलाची भूमिका बजाविणारे सेवाव्रती देवदूत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेले कार्य संस्मरणीय आणि अग्र स्थानावर राहिले आहे.

कोरोना महामारी मध्ये आपल्या दानतीचे व माणुसकीचे दर्शन देताना मागील वर्षात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी लाखो जणांना मदतीचा हात दिला. त्यांनी स्वखर्चातून दिड लाखाहून अधिक अन्नधान्याचे किट, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून अन्नछत्र, गावाला जाण्यासाठी मदत, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्वछता मोहिम, आर्थिक मदत, याखेरीज अर्सेनिक अल्बम गोळ्या, सॅनिटायझर, मास्कचे वाटप, गणपती सण गोड करण्यासाठी ६० हजार जणांना प्रसादासाठी अन्नधान्य, अशी हरएक आवश्यक मदत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून झाली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कार्यक्रमे राबविले जातात. मात्र या वर्षीही कोरोना महामारीचे संकट आहे. त्यामुळे कोणतेही सार्वजनिक कार्यक्रमे होणार नसले तरी समाजोपयोगी उपक्रम सुरूच राहणार आहेत. त्या अनुषंगाने पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचे वाटप करण्यात येत आहे. आतापर्यंत तब्बल ७२ हजार ८४७ रेशन किट वाटप झाले आहे. १९८९ आणि त्यानंतर २००५ साली झालेल्या महापुराने संपूर्ण जनजीवन विस्कळीत केले गेले. पनवेल परिसरातही हाहाकार माजला. हजारो जणांना खाण्यास अन्न आणि राहण्यास निवारा उरला नव्हता. अशावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तळागातील व्यक्तीला अन्न धान्य, कपडे व इतर जीवनावश्यक वस्तू भरभरून पुरविल्या, त्या त्यांनी सामाजिक बांधिलकीतूनच.

२० टक्के राजकारण आणि ८० समाजकारण हा लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पिंड राहिला आहे, त्यामुळे राजकारणातूनही सामाजिक कार्यच झाले पाहिजे हि लोकभावना त्यांनी समाजात रुजवली. प्रत्येक संकटात ते सर्व समाजासाठी धावून आले आहेत. १९८९, २००५ साली प्रलयकाळी महापूरात प्रत्यके गावागावात त्यांनी जाऊन लोकांची विचारपूस केली आणि भरभरून मदतही केली. सध्या कोरोनाच्या भीषण काळातही त्यांनी लोकांसाठी नेहमीप्रमाणे मदतीची कवाडे खुली केली, त्यामुळे हातावरचे पोट असलेल्यांना, सर्वसामान्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोठा आधार दिला. कोणत्याही आपत्तीमध्ये लोकांना भरभरून मदत करणे हा त्यांचा आत्मा आहे, त्यामुळे त्यांचे कार्य देवदूतासारखे असल्याचे सर्वश्रुत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य महान आहे. त्यांच्यावर अनेक पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत. त्याच्यात तसा उहापोहही आला आहे. अनेकांनी त्यांचा आदर्श घेऊन आपली कारकीर्द यशस्वी केली आहे. त्याचप्रमाणे राजकारणातून समाजकारण आणि सेवाभावी वृत्ती अंगिकाराला लोकनेते रामशेठ यांचा जीवनप्रवास आणि वाटचाल युवा पिढीसाठी खूप मोलाची ठरणार आहे. त्यामुळे 'आप जिओ हजारो साल, साल के दिन हो पचास हजार' अशा शब्दात वाढदिवसानिमित्त तुम्हा-आम्हा-सर्वांचे देवदूत रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# लोकसेवक
## लोकनेते रामशेठ ठाकूर



माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी भारतीय संसदेत सर्व सामान्य जनतेचे लोकप्रतिनिधी म्हणून केलेले काम उल्लेखनीय असे असून ते पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शिक्षण वारसा घेऊन काम करीत आहेत. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या रायगड व मुंबई विभागातील सच्चे विकासपुरुष ही त्यांची खरी ओळख आहे. अतिशय सामान्य कुटुंबात पोटाची खळगी भरण्यासाठी कष्टात राहिलेल्या आई वडीलांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. जगण्याचा संघर्ष करत करतच जीवनाकडे व आजूबाजूच्या समाजाकडे परिवर्तनशील विधायक भूमिकेतून बघण्याची जीवनदृष्टी त्यांनी आत्मसात केली. परंपरागत कष्टप्रद जीवनात अडकून पडण्यापेक्षा शिक्षणाचा मार्ग अनुसरुन जीवनाला गती देता येवू शकते हा विचार त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. पक्षी आपला मार्ग स्वतःहून शोधतात तसे त्यांनी शैक्षणिक दिशा घेवून जीवन समृद्ध करण्याची जिद्द बाळगली.

रयतेच्या स्वप्नांचे शिल्पकार ठरलेले कर्मवीर आण्णा यांचा आदेश डोळ्यासमोर ठेवून आपले शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील काम सुरू ठेवले. रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व रायगड विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी मिळाली त्या जबाबदारीचे कर्तव्य भावनेत रूपांतर करून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल, नवी मुंबई व रायगड आणि राज्यातील इतर अनेक शाखा सोयीसुविधा युक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. आपल्या सेवाभावी वृत्तीचे सदोदित दर्शन घडवत रयतेचे शैक्षणिक काम म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचे काम असे समजून सदैव त्यात झोकून देवून शैक्षणिक प्रगतीची दारे त्यांनी सर्वांना खुली केली. मानवता सेवा आणि स्वावलंबनाचे बाळकडू सातारा येथील शिवाजी कॉलेज येथे शिकताना 'कमवा आणि शिका' या योजनेत त्यांना मिळाले होते. त्यांची दृष्टी समाजहितासाठी धडपडणारी घार झाली होती व सत्ता हे केवळ सेवेचे साधन मानून शिक्षण क्षेत्रात नवनवीन करण्याचा ध्यास देखील त्यांचा होता.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा भारतीय संसदेत खासदार म्हणून काम करताना देखील त्यांनी निरपेक्ष व निस्पृह सेवेच्या भावनेने व कोणताही गर्व मनात न बाळगता समाजाला अभिप्रेत काम केले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मार्ग त्यांनी आपला वैचारिक मार्ग म्हणून अंगिकारला. आणि तो मार्ग त्यांना नेहमीच प्रेरणा देणारा ठरला. सर्व सामान्य लोकांच्या विचार मनीमानसी ठेवून समाजहित वृत्तीने भारावून जावून काम करणारे व लोकांचे प्रश्न व समस्या यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आता महाराष्ट्रात एक दातृत्वशाली व्यक्तिमत्व म्हणून सुपरिचित आहेत. एखाद्या तहानलेल्या पाणी देताना जसा आनंद मिळतो तसा आनंद एखाद्या शाळा कॉलेज सुविधा उपलब्ध करून देताना त्यांना होत असतो. मनाची उदारता ही कृत्रिम कधीच नसते ती नैसर्गिक व आई वडीलांच्या, गुरुजनांच्या विचार संस्कारातून आलेली असते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या बाबतीतही तेच म्हणता येईल. ते एक नैसर्गिक उदार अंतःकरणाचे लोकसेवक आहेत. त्यांच्या दातृत्वाची व सेवेची पुष्कळ उदाहरणे आहेत. पनवेल, मुंबई व रायगड मधील परिसरात त्यांच्या कामातून त्यांनी जनतेत निर्माण केलेली आपुलकी व जिव्हाळा संस्मरणीय आहे. आयुष्यात काहीतरी लोकांसाठी केले तर त्यात 'राम' आहे असे म्हणतात. त्यांच्या नावात 'राम' आणि 'शेठ' असा उल्लेख आहे. मात्र ते शेठ नावाने कधीच वागले नाहीत तर प्रभू रामाचा अंश असलेले आणि सामाजिक बांधिलकी कार्याचे 'शेठ' माणूस आहेत. थेट कर्मवीर आण्णांचा आशीर्वाद लाभलेले हे एक इतरांना नवजीवन



व नव शिक्षण देणारे अनोखे विकासाभिमुख व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या कर्तृत्वाला आमचा सलाम! लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुढील आरोग्यदायी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

**शब्दांकन : सौ. जयश्री धापते- चिटणीस,**
**भाजप महिला मोर्चा, रायगड जिल्हा**